REGISTERED No. B. 3134




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २८ जानेवारी १९४८ अंक ४


## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखाः—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

—: शाखा :—

(१) कोल्हापूर, (२) शाहुपुरी, (३) सांगली, (४) मिरज, (५) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | १०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजे) | ... | १८,००,००० |

—अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात—

नामदार बी. बी. पाटील
B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.
चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले.
M. L. A.
कोल्हापूर
व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा.
B. Com., C. A. I. I. B.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक. लिमिटेड

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली) ● स्थापना १९११

—मुख्य कचेरी—

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग

९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५१

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | २०,१४,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | २५,६५,००० रु. |

खेळतें भांडवल ७ कोटी रुपयांवर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

**संयुक्त प्रांतांत घड्याळाचा धंदा**—संयुक्त प्रांताचे उद्योग-मंत्री श्री. मालवीय ह्यांची आणि स्वित्झरलंडचे एक मंत्री मि. रॉजर ह्यांची नुकतीच भेट झाली. संयुक्तप्रांतांत घड्याळें व इतर सूक्ष्ममापन यंत्रें तयार करण्याचे कारखाने उभारण्यासंबंधीं भेटींत चर्चा करण्यांत आली. मि. रॉजर ह्यांनीं सर्व प्रकारच्या मदतीचें आश्वासन दिलें असें समजतें. खुद्द श्री. मालवीय ह्याच कामासाठी युरोपला जाण्याचा संभव आहे.

**बँक ऑफ बरोडा लि.**—वरील बँकस १९४७ सालीं सुमारें २७½ लक्ष रु. नफा झाला. भागीदारांस १०% डिव्हिडंड मिळेल.

**पाकिस्तानांत मिठावर कर**—पाकिस्तान सरकारनें एक वट-हुकूम काढून देशांत तयार होणाऱ्या अगर बाहेरून आयात होणाऱ्या मिठावर दर मणामागें २॥ रुपये कर बसविला आहे.

**अमेरिकेची यांत्रिक नांगरांची मागणी**—अमेरिकेंतील एका कंपनीनें २ कोटी डॉलर्स किंमतीच्या ब्रिटिश यांत्रिक नांगरांसाठीं ब्रिटनमधील एका कारखान्याकडे मागणी नोंदविली आहे. अमेरिका ब्रिटनकडून ६ कोटी डॉलर्सचे यांत्रिक नांगर घेण्यास तयार आहे, असें समजतें.

**अमेरिकेंत औद्योगिक संप कमी झाले.**—अमेरिकेंत मजुरांच्या संपामुळें १९४६ सालीं जेवढे कामाचे दिवस बुडाले, त्यांचे मानानें १९४७ सालीं फक्त ३३% दिवस बुडाले, असें समजतें. १९४६ सालीं ५,००० संप होऊन त्यांत ११½ कोटी कामाचे दिवस बुडाले होते; १९४७ सालीं ३,६०० संपांत फक्त ३½ कोटी कामाचे दिवस बुडाले. १९४६ सालीं ४६ लक्ष कामगारांनीं संपांत भाग घेतला होता; १९४७ सालीं त्यांची संख्या फक्त २२ लक्ष भरली.

**ग्रीसचें सोनें परत**—अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेंत ग्रीक सरकारचें २० लाख डॉलर्सचे सोनें होतें. हें सोनें अमेरिकन सरकारनें ग्रीक सरकारला परत देण्यास संमति दिली आहे. सोन्याची मुक्तता तावडतोब होणार असून, त्याचा उपयोग ग्रीसची बँक नवीन नाणीं पाडण्यासाठी करणार आहे. अमेरिकेनें युगोस्लाव्हिआचें सोनें परत करण्यास मात्र नकार दिला आहे.

**रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण?**—फेब्रुआरी ४ रोजीं घटना समितीच्या कायदेमंडळी अधिवेशनांत श्री. मोहनलाल सक्सेना हे रिझर्व्ह बँक आणि इंपीरिअल बँक ह्यांच्या राष्ट्रीयीकरणाचा ठराव प्रथम मांडणार आहेत. श्री. टी. कृष्णाम्माचारिअर ह्यांच्या, विम्याचा धंदा सरकारनें ताब्यांत घेण्याच्या ठरावाचा अनुक्रम दुसरा लागला आहे.

**हिंदी संघराज्याकडून पाकिस्तानला कोळसा**—चालू महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यांत हिंदुस्थानकडून पाकिस्तानला कोळसा जाऊं शकला नाहीं. आतां दररोज ९० वाघिणी कोळसा पाकिस्तानला जात आहे. पाकिस्तानमधील रेल्वेजना रोजीं १२७ वॅगन्स कोळसा लागतो. सध्याप्रमाणें कोळसा जात राहिल्यास पाकिस्तानमधील रेल्वेजच्या वहातुकींत करण्यांत आलेली कपात बंद करतां येईल असा अंदाज आहे.

**ब्रह्मदेशांतील परकीय कंपन्या**—ब्रह्मदेशांतील परकीय कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण तावडतोब करण्यांत येणार नाहीं असें समजतें. परकीय कंपन्यांत ब्रिटिश मालकीच्या व्यापारी कंपन्याच अधिक आहेत.


# सारस्वत
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई



टे. नं. ३१६७५ ३०-११-१९४७

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,११,००० |
| ठेवी ... | रु. ७५,५९,१०० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ८१,३८,५०० |

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा—

सब-ऑफिस : —दादर— (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

# दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली
(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,११,८५० रु. |
| भरलेलें भांडवल | ७४,१७० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १००,००० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | १०,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिश: भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचें तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.**

—अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—

**ना. पां ठाणेदार**
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १८ जानेवारी १९४८




प्रो. वा. गो. काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. मह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## कापड व सूत ह्यांवरील नियंत्रणें उठविण्यांत आलीं

### गिरणीमालकांची संघटना किंमती ठरविणार

नोव्हेंबर, १९४७ मध्यें हिंदुस्थान सरकारनें सूत व कापड ह्यांच्या उत्पादनाबाबत "स्टँडर्डायझेन स्कीम" अंमलांत आणण्याचा आपला निर्णय जाहीर केला, परंतु त्यानंतर मालावरील नियंत्रणें यथाक्रम रद्द करण्याचें धोरण सरकारनें अंगिकारलें आणि अन्नधान्यावरील निर्बंध शिथिल केले. आतां कापडावरील निर्बंधहि पुष्कळच ढिले करण्यांत येत आहेत.

प्रत्येक गिरणी ह्यापुढें बाजाराच्या मागणीस अनुसरून आपला उत्पादनाचा कार्यक्रम आखील. उत्पादन शक्य तेवढें वाढावें ह्या दृष्टीनें गिरणीमालक व कामगार ह्यांचेमध्यें विचारविनिमय व्हावा ह्यासाठी प्रत्येक गिरणींतून "उत्पादन समिति" नेमली जाईल, परंतु त्याबाबत तपशिलाचा विचार अद्याप चालू आहे.

नियंत्रण उठल्यामुळें एकदम भरमसाट किंमती वाढूं न देण्याबद्दल गिरणीमालकांच्या संघटनेनें सरकारास आश्वासन दिलें आहे. त्याचें स्वागत करून, किंमती ठरविण्यास मालकांच्या संघटनेस मुभा देण्यांत आली आहे. ह्या किंमतींचें वैयक्तिक गिरणीमालकाकडून अतिक्रमण होऊं नये, ह्याविषयीं सरकार दक्षता घेईल. टॅरिफ बोर्डाचें सध्या चालू असलेलें चौकशीचें काम पुरें होऊं दिलें जाईल.

कापडाचा व्यापार मामुली मार्गानें चालावा अशीच सरकारची इच्छा आहे. कोटाहोल्डर्सची पद्धत रद्द केली जाईल. तुटीच्या क्षेत्रांत फेअर प्राइस शॉप्स उघडण्याचें गिरणीमालकांनीं मान्य केलें आहे. प्रांताप्रांतांतल्या कापडाच्या वहातुकीस टेक्स्टाइल कमिशनरची मान्यता लागेल.

सुताच्या वांटपाची सध्याची पद्धति हातमागवाल्यांच्या हिताच्या दृष्टीनें चालू ठेवण्यांत येईल, परंतु सूत वाटल्यानंतर योग्य मुदतींत तें उचललें गेलें नाहीं तर तें इच्छेप्रमाणें हलविण्यास गिरण्यांना मोकळीक राहील. कपाशीच्या पुरवठ्याची परिस्थिति असमाधानकारक असल्यामुळें, हिंदी गिरण्यांत कातण्यांत येणाऱ्या सुतास जरूर असणारी सर्व कपास त्यासाठी राखली जाणें अगत्याचें आहे. म्हणून १३।१६ " व त्यावरील कपाशीच्या निर्गतीची बंदी कायम राहील.

कपाशीची कमाल व किमान किंमत आतां सरकार-नियंत्रित रहाणार नाहीं. निर्गतीवरील जकात सध्याच्या दुप्पट घेतली जाईल. कपाशीची किंमत फार उतरूं लागल्यास योग्य ती उपाययोजना सरकार अर्थातच करील.

कापडाची निर्गत आणि मशिनरी, स्टोर्स, रंग, रसायनें, सायझिंगचें साहित्य, इत्यादींवरील नियंत्रणें कायम रहातील.

सरकारच्या धोरणाशीं गिरणीमालक, कामगार, व्यापारी व जनता हे सहकार्य करतील अशी आशा सरकारनें व्यक्त केली आहे. परंतु जरूर तर पुनः नियंत्रणें बसविण्याची आपली तयारीहि सरकारनें ठेवली आहे आणि त्यासाठी नियंत्रणाचा जरूर तेवढा साचा कायम राखण्यांत येत आहे.

नियंत्रण गेल्यामुळें कनिष्ठ दर्जाचें कापड २६% महाग होईल व उच्च दर्जाचें कापड ९% महाग होईल अशी अपेक्षा आहे. गिरणीमालकांनीं किंमतींत केलेली वाढ योग्य आहे किंवा नाहीं, हें टॅरिफ बोर्डाचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला म्हणजे समजून येईलच. नियंत्रण दूर झाल्यामुळें उत्पादन कितपत वाढेल ह्याबद्दल मात्र शंका व्यक्त करण्यांत येत आहे. गिरणीमालक व कामगार ह्यांचेमधील तेढ दूर होण्यावरच ही बाब बव्हंशीं अवलंबून आहे.

कपाशीच्या निर्गतीवरील नियंत्रणामुळें कपाशीची किंमत खालीं येण्याचा संभव आहे, अशी भीति इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीचे उपाध्यक्ष, श्री. आर. जी. सरय्या, ह्यांनीं व्यक्त केली आहे. आखूड धाग्याच्या फक्त तीन-चार जातींच्या कपाशीसच फक्त (बंगाल देशी, उमरा देशी, मथिया, आसाम, कॉमिल्ला) निर्गतीस मुभा ठेवण्याइतकी हिंदी कपाशीच्या पुरवठ्याची परिस्थिति निराशाजनक नाहीं, असें ते म्हणतात. कित्येक जातींच्या कपाशीचा हिंदी गिरण्यांत उठाव होण्याजोगा नाहीं व त्यांच्या किंमती पडल्याविना रहाणार नाहींत. कपाशीच्या निर्गतीवरील, दर खंडीस ४० रु. जकात आतां ८० रु. करण्यांत आली आहे तिला तर श्री. सरय्या ह्यांचा कसून विरोध आहे.

कपाशीशीं हितसंबंध असणारांस सरकारचे निर्णय स्वागतार्ह वाटत नसले तरी गिरणीमालक मात्र खूष दिसतात.

---

**पाकिस्तानावर आर्थिक संकट ?** —पाकिस्तानमधील लोकांनीं पोट बांधून कामें केल्याखेरीज आणि श्रीमंतांनीं खर्च कमी करून पैसे उद्योगधंद्यांत गुंतविल्याखेरीज पाकिस्तान जगूं शकणार नाहीं, असे उद्‌गार पाकिस्तानचे अर्थमंत्री मि. गुलाम महंमद ह्यांनीं नुकतेच काढले. पाकिस्तानमध्यें उद्योगधंदे नसल्यानें अगर ते तात्काळ उभारण्याची शक्यता नसल्यानें उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न व्यवहार्य नाहीं असें मत त्यांनीं व्यक्त केलें. लाहोरमधील श्रीमंतांच्या खाण्यावर त्यांनीं टीका केली.

**प्रिन्सेस एलिझाबेथला तनखा** —प्रिन्सेस एलिझाबेथ आणि तिचे यजमान प्रिन्स फिलिप ह्या दांपत्याला सालीना ५०,००० पौंडांचा तनखा देण्याचें बिल कॉमन्स सभागृहांतील दुसऱ्या वाचनांत २९४ विरूद्ध १७ मतांनीं मंजूर करण्यांत आलें.

**सिनेमाच्या धंद्याच्या अडचणी** — मोशन पिक्चर सोसायटीचे अध्यक्ष श्री. चुनीलाल ह्यांनीं सरदार वल्लभभाई पटेल ह्यांची भेट घेऊन धंद्यांतील अडचणींसंबंधीं एक खलिता त्यांस सादर केला. चित्रपट मंजूर करणारें एक मध्यवर्ती सेन्सॉर बोर्ड असावें, धंद्याचें तांत्रिक शिक्षण देण्यासाठी सरकारनें साह्य केलेल्या संस्था असाव्या, आणि धंद्यावरील सध्याचा जबर कर कमी करण्यांत यावा, अशा मागण्या मुलाखतींत करण्यांत आल्या. शिष्टमंडळानें निर्वासितांच्या मदत फंडाला ७२,००० रुपये दिले.

## प्रो. वामन गोविंद काळे ह्यांचें पुण्यस्मरण

(श्री. य. द. खोले)

प्रो. वामन गोविंद काळे, एम. ए. ह्यांच्या निधनास दिनांक २७-१-४८ रोजीं दोन वर्षें संपूर्ण होतील. प्रो. काळे यांच्या ह्या स्मृतिदिनानिमित्त आदरयुक्त शब्दांजली वाहणें योग्य असेंच ठरेल.

प्रो. वा. गो. काळे हे अगदीं मध्यम स्थितीमधील परंतु चारित्र्यवान् अशा कुटुंबांत जन्मास आले व सतत दीर्घोद्योग, अभ्यास, निर्भिडपणा या गुणांवरच त्यांनीं आपलें नांव अखिल भारतांत अजरामर करून ठेवलें. इतिहास व अर्थशास्त्र ह्या विषयांची गोडी लागून त्यांत त्यांनीं असामान्य असें स्थान पटकाविलें. न्या. मू. रानडे यांच्या सान्निध्याचा पूर्णपणें उपयोग करून त्यांची मत-प्रणालिनी प्रो. काळे यांनीं सर्व भारतांत प्रसृत केली, महाराष्ट्रीय स्वार्थत्यागाचा बाणा अंगिकारला व म्हणूनच सुरवातीस डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्यें काम करण्याचें पत्करून तेथें योग्य कालपर्यंत सेवा केली. मध्यंतरी टारिफ बोर्डावरील मानाची जागा कांहीं काल भूषित केली परंतु त्या जागेची कालमर्यादा आग्रहपूर्वक वाढविली जात असतां ती केवळ आपल्या अंगीकृत कार्यांत अडचण येऊं नये म्हणून त्यांनीं नाकारली.

अर्थशास्त्र व सहकारी चळवळ यांचा फार निकट संबंध असल्यानें सहाजीकच त्यांचें प्रथम लक्ष सहकारी चळवळीकडे गेलें व पहिल्या महायुद्धाचे काळांत त्यांनीं ग्राहक संघ काढण्याचे बाबत पुढाकार घेतला व पुढें योग्य काल येतांच त्यांनीं सहकारी चळवळीशीं समरस होण्याचें ठरवून ते या चळवळीशीं सुमारें १७-१८ वर्षें आत्मीयतेनें समरस झाले. प्रो. काळे यांचेवर त्यांच्या अर्थशास्त्रज्ञ अशा सहकारी मित्रांचा आरोप असे कीं त्यांनी जितके श्रम व वेळ सहकारी चळवळींत खर्च केले तितके श्रम व वेळ आर्थिक प्रश्नाबाबत केले असते तर त्याचा उपयोग देशास जास्त मोठा झाला असता व प्रो. काळे यांचे कीर्तींत आणखी मोठी भर पडली असती. सहकारी चळवळींत प्रो. काळे यांनीं आपलें स्थान निश्चित उच्च-दर्जाचें ठेवलें होतें. सहकारी चळवळीचा साकल्यानें विचार करून निर्भीडपणें पण हितकारक असे विचार मांडण्याची त्यांची हातोटी असल्यामुळें त्यांचा दरारा असे.

सहकारी चळवळीबरोबरच त्यांनीं महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रांत फार मोठी कामगिरी केली. महाराष्ट्रीय नियंत्रणाखालीं बँका, साखर कारखाने, विमाकंपन्या, गिरण्या इ. यावेत या हट्टानें त्यांचे श्रम खर्ची पडले परंतु महाराष्ट्राची प्रकृति व प्रवृत्ति यांमुळें त्यांस मानसिक त्रास सोसावा लागला. महाराष्ट्राची थोडी व्यापारी वृत्ति जास्त कार्यक्षम होऊं शकली असती तर त्यांचा फार चांगला उपयोग झाला असता.

महाराष्ट्रांत अशी एक विचारसरणी आहे कीं अर्थशास्त्रज्ञ हे केवळ पुस्तकी विचारानें भारून गेलेले असून त्यांची व्यावहारिक दृष्टि समाजहितकारक अशी नाहीं आणि यामुळें समाजांतील एक भाग नेहमीं अर्थशास्त्रज्ञ यांचे विरुद्ध आहे. पूर्ण विचारांतीं असेंच म्हणावें लागेल कीं देशाच्या सर्व महत्त्वाच्या जीवनांत अर्थशास्त्रास फार मोठें स्थान आहे व अशा स्थानामध्यें अर्थशास्त्रज्ञांनीं दिलेला सल्ला जरी न मानवणारा असला तरी तो परिणामी हितकारकच असतो.

आजच्या देशाच्या चालू घडामोडीमध्यें प्रो. वा. गो. काळे यांचा निश्चित उपयोग झाला असता. आज ते जरी हयात नसले तरी त्यांचे जागीं काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनीं त्यांची विचार-सरणी पुरस्कृत करून त्यांचें काम पुढें चालविल्यास त्यांचे आत्म्यास निश्चित आनंद वाटेल.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

१६ जानेवारी अखेरच्या आठवड्याचें, इश्यू खात्याचें पत्रक

| देणें | रु. | रु. |
|---|---|---|
| बँकिंग खात्यांतील | | |
| नोटा | ११,६२,२५,००० | |
| प्रसृत नोटा. | १२६२,२३,३२,००० | |
| काढलेल्या एकूण | | |
| नोटा | | १२७३,८५,५७,००० |
| एकूण देणें | | १२७३,८५,५७,००० |

| जिंदगी | रु. | रु. |
|---|---|---|
| अ सोनें, नाणी व चिपा | | |
| (१) हिंदुस्थानांत | ४४,४१,४५,००० | |
| (२) हिंदुस्थानाबाहेर | ... | |
| स्टर्लिंग रोखे | ११३५,३२,८९,००० | |
| अची बेरीज | | ११७९,७४,३४,००० |
| ब रुपये | | ३६,२७,१९,००० |
| हिंदुस्थान सरकारचे रोखे | | ५७,८४,०४,००० |
| बिलें, इ. | | ... |
| एकूण जिंदगी | | १२७३,८५,५७,००० |

### गुमास्ता कायद्याचा व्याप वाढणार

बॉंबे शॉप्स अँड एस्टॅब्लिशमेंट्स ॲक्ट (१९३९) मध्यें दुरुस्ती सुचविण्यासाठी मुंबई सरकारनें एक समिती नेमली होती. तिनें सुचविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करून कायद्यांत बदल करण्यापूर्वी, लोकमत अजमावण्याकरितां, सरकारनें कमिटीच्या शिफारशींवर अभिप्राय मागविले आहेत ते सरकारास ९ फेब्रुवारीचे आंत पोचावेत. रहाण्याची व्यवस्था असलेलीं होटेल्स व क्लब्स कायद्याच्या कक्षेंत आणावींत, २५ हजारांवरील लोकसंख्येच्या सर्व ठिकाणांस कायदा लागू करावा, दुकानांतील कामाचे साप्ताहिक तास ठरवून टाकावे, सकाळीं ७ ते रात्रीं ७ ह्या खेरीज इतर वेळीं स्त्रियांस काम करण्यास बंदी असावी, मुलांच्या वयाची मर्यादा १२ ची १४ वर्षें करावी, कारखान्यांतील कारकून वर्गास फॅक्टरी ॲक्ट लागू करावा, इत्यादि शिफारसी कमिटीनें केल्या आहेत.

### चित्रमयजगत्

#### खास पुनर्घटना अंक

हिंदी राष्ट्र स्वयंपूर्ण होण्यासाठी विविध अंगांची पुनर्घटना कशी करण्यांत यावी, ह्याचें दिग्दर्शन करण्यासाठी चित्रमयजगत्नें हा खास अंक प्रसिद्ध केला आहे. त्यामध्यें वेगवेगळ्या दृष्टिकोणानें अभ्यासपूर्वक लिहिलेले अनेक लेख वाचकांस वाचावयास मिळतील. परराष्ट्रांतील औद्योगिक व आर्थिक घडामोडींची माहिती देणारे कांहीं लेखहि प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. चित्रें, तक्ते, इत्यादी भरपूर आहेत. चालू आर्थिक व औद्योगिक घडामोडींचें आकलन होण्यास प्रस्तुत अंक चांगलें सहाय करील.

[ हे प्रॉस्पेक्टस नसून केवळ माहितीपत्रक आहे ]

# दि डेक्कन पॉटरीज् ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज् लि०

[ इंडियन कंपनीज् ॲक्ट सन १९१३ अन्वयें नोंदविली आहे. ]

**अधिकृत भांडवल रु. २०,००,०००**
**( वीस लाख रुपये )**
रु. ५० चा एक शेअर याप्रमाणें एकूण ४०,००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलें आहे.

**विक्रीस काढलेलें भांडवल**
**रु. ५,००,००० (पांच लाख रुपये)**
रु. ५० चा एक शेअर याप्रमाणें एकूण १०,००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलें आहे.

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

रावबहादूर गणेश गोपाळ शेंबेकर, जमीनदार, बारामती. ( चेअरमन )
श्रीयुत मोहनीराज गंगाधर आठल्ये, बी. एजी., जमीनदार, येवले.
श्रीयुत गोवर्धनभाई देवजीभाई पटेल, बी. एजी., जमीनदार, सिसवा, जिल्हा कैरा.
श्रीयुत अनन्त नारायण कोटीभास्कर, बी. एससी., मुंबई.
श्रीयुत भास्कर विष्णु धारप, १५ सरदारगृह, मुंबई.
श्रीयुत गजेश रामचंद्र साने, बी. ए., व्यापारी, पुणें नं. २ ( एक्स–ऑफीशिओ डायरेक्टर )

श्रीयुत बाळकृष्ण विष्णु तांबे, संस्रगिरी सदन, मुंबई नं. ४ ( व्हाईस चेअरमन )
रावबहादूर नारायणराव सोपानराव बोरावके, जमीनदार व बागाईतदार, बेलापूर.
श्रीयुत काशिनाथ गोविंद कार्णिक, १२१७ फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें नं. २.
श्रीयुत हरी केशव जोशी, बी. एससी., पुणें नं. २.
श्रीयुत वसंत प्रभाकर फणसळकर, टिळक रोड, पुणें नं. २ ( एक्स्–ऑफीशिओ–डायरेक्टर )
श्री. यशवन्त विठ्ठल खेर, टिळक रोड, पुणें नं. २, पॉटरी तज्ज्ञ, ( एक्स्–ऑफीशिओ डायरेक्टर )

### बँकर्स

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक, लि पुणें व शाखा
दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि. पुणें व शाखा
न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. पुणें व शाखा
दि भारत इंडस्ट्रिअल बँक, लि. पुणें व शाखा

### ऑडिटर्स

मेसर्स डी. डी. जोशी आणि कंपनी, रजिस्टर्ड अकौंटंटस् आणि ऑडिटर्स; १९ लक्ष्मीनारायण बाग, वायरोड नॉर्थ, माहिम, मुंबई नं. १६.

### कायद्याचे सल्लागार

श्रीयुत के. एन. फडके, बी. ए., एलएल. बी., सदाशिव पेठ, पुणें नं. २.
श्रीयुत आर. पी. भागवत, बी. ए., एलएल. बी., सदाशिव पेठ, पुणें नं. २.

### मॅनेजिंग एजन्टस्

**मेसर्स नॅशनल ट्रेडिंग कंपनी**
१९६।३९ सदाशिव पेठ, पुणें नं. २

रजिस्टर्ड ऑफिसः—१९६।३९ सदाशिव पेठ, फणसळकर बंगला, टिळक रोड, पुणें नं. २.
फॅक्टरीः-चिंचवड ( जी. आय. पी. रेल्वे स्टेशनजवळ )
तारेचा पत्ताः— " पॉटर्स-पूना "

( १ ) कंपनी मुख्यतः कपबशा, बरण्या, कौलें, फ्लोअरिंग टाइल्स् वगैरे नित्योपयोगी मालाच्या उत्पादनासाठी स्थापन केली आहे.
( २ ) महाराष्ट्रांतील मोठ्या प्रमाणांतील हा वरील मालाच्या उत्पादनासाठी निघणारा पहिलाच कारखाना आहे.
( ३ ) चिंचवड रेल्वे स्टेशनजवळ कारखान्यासाठी भरपूर जागा कंपनीच्या मालकीची घेतली असून मालाची ने-आण करण्यास रेल्वे स्टेशन अगदीं नजीक आहे.
( ४ ) मालाच्या खपासाठी बाजार ( Market ) अगदीं नजीक व भरपूर आहे.
( ५ ) डायरेक्टर बोर्डांतील सदस्य उद्योगधंद्यांतील क्षेत्रांत नांवाजलेले असेच आहेत.
( ६ ) पॉटरीतज्ज्ञ हे मॅनेजिंग एजन्सी फर्मचे भागिदार असून गेलीं वीस वर्षें त्यांनीं ह्या धंद्यांतील क्षेत्रांत पूर्णपणें अनुभव घेतलेला आहे.
( ७ ) कारखान्यास लागणारीं कचीं द्रव्यें व इतर साहित्य मिळविलें असून कारखाना उभारण्यास सुरवात झाली आहे.
( ८ ) कंपनीच्या कपबशा बाजारांत लवकरच विक्रीस येतील असा भरवसा वाटतो.

**शेअर्स वगैरे माहितीसाठी कंपनीचे रजिस्टर्ड ऑफिसचे पत्त्यावर पत्रव्यवहार करा अगर समक्ष भेटा.**

**ग्रीक गनिमांना मदत**—युगोस्लाव्हिआच्या सहा प्रजासत्ताक राज्यांनीं ग्रीक गनिमांच्या चळवळीला मदत करण्यासाठी पृथक कमिट्या स्थापन केल्या आहेत. युगोस्लाव्हिआच्या कामगार संघटनेतर्फे एक मध्यवर्ती मदत संस्था ह्याच कार्यासाठी नुकतीच स्थापन करण्यांत आली आहे.

**घरांच्या दुरुस्तीसाठी कर्जें**—पूर्व पंजाबमधील खेडेगांवांतील घरांच्या करायलाच पाहिजे अशा स्वरूपाच्या दुरुस्त्यांसाठी पूर्व पंजाब सरकारनें १३ लाख, २५ हजार रुपये मंजूर केले आहेत. हीं घरें राहण्याजोगीं झालीं तर पूर्व पंजाबांतील रहाण्याच्या जागेचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

**उद्योगधंद्यासाठी माणसांची नोंदणी**—ब्रिटननें औद्योगिक वृद्धीसाठी माणूसबळाची मोजदाद करण्याचें ठरविलें होतें. त्या योजनेंतील दुसऱ्या भागास नुकताच प्रारंभ झाला असून १९२३ ते १९२९ च्या दरम्यान जन्म झालेल्या, बेकार स्त्री-पुरुषांची नोंदणी करण्यांत येत आहे. माणूसबळावर पहिला हक्क जरूरीच्या धंद्यांचा आहे.

**सिंधूवरील धरण**—सिंधूच्या मुखाकडील भागांत होणारें धरण बांधण्याच्या कामास १९४८ सालच्या हिंवाळ्यांत प्रारंभ होईल. धरणासाठी २५ कोट रुपये खर्च होतील आणि तीन वर्षांत तें पुरें होईल. सध्या कालवे खणण्याचें काम चालू आहे. धरणाखालीं ३० लाख एकर जमीन नव्यानें भिजेल.

**लढाऊ जहाजें जुनीं, म्हणून त्याज्य**—ग्रेट ब्रिटननें क्वीन एलिझाबेथ (३२,७०० टन), व्हॅलिअंट (३१,००० टन), नेल्सन (३३,९५० टन) आणि रोडने (३३,९०० टन) हीं लढाऊ जहाजें आपल्या आरमारांतून काढून टाकण्याचें ठरविलें आहे. सध्याचें युद्धतंत्र लक्षांत घेता, हीं जहाजें जुनीपुराणी झालीं आहेत, असें त्याचें कारण सांगण्यांत आलें आहे.

**फळझाडांच्या लागवडींत वाढ**—मुंबई प्रांतांत फळझाडांची लागवड वाढविण्यासाठी प्रांतिक सरकारनें ६,४३,६२५ रुपयांची योजना मंजूर केली आहे. पन्हेरीं तयार करण्यासाठी पुणतांबे, धारवाड, रत्नागिरी व बलसार येथें मुख्य व बोर्डी, बोरगांव, धुळें, अरभावी आणि बागलकोट येथें दुय्यम केंद्रें स्थापन केलीं जातील.


**गॅसच्या अभावीं २६५ दिवे बंद**—हिंदुस्थान सरकारनें बॉंबे गॅस कंपनीचा कोळशाचा कोटा कमी केला, त्यामुळें मुंबईमध्यें गॅसचा तुटवडा पडला आहे. घरगुती वापरासाठी देण्यांत येणारा गॅस कमी न करतां, रस्त्यांवरील २६५ गॅसचे दिवे बंद ठेवण्यांत आले आहेत. मुंबई शहरांतील रस्त्यांवर म्युनिसिपॅलिटीचे एकूण १०,९३३ दिवे आहेत, त्यांपैकी फक्त १,९६७ विजेचे व २१२ तेलाच्या गॅसचे आहेत; बाकीचे ८,७५४ कोळशाच्या गॅसवर चालणारे आहेत. १९४६-४७ मध्यें ह्या दिव्यांनीं १८ कोटी घनफूट गॅस वापरला, त्यास ५,५१,००० रु. खर्च आला.

---

### "सहकारी परिषद्" पुरवणी

**ता. ४ फेब्रुवारी रोजीं प्रसिद्ध होणार.**

पुणें येथें भरलेल्या महाराष्ट्र विभाग सहकारी परिषदेंतील स्वागताध्यक्ष व अध्यक्ष ह्यांचीं संपूर्ण भाषणें, परिषदेनें सम्मत केलेले ठराव, इत्यादि पूर्णपणें देणाऱ्या "अर्था"च्या पुरवणीस ठिकठिकाणाहून मागणी येत आहे ती पुरी पाडता यावी, ह्याकरितां पुरवणी ता. ४ फेब्रुवारीच्या अंकाबरोबर प्रसिद्ध केली जाईल.




नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड
- शेड्यूल्ड बँक -

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ३,९०,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
श्री. धों. कृ. साठे (चेअरमन), श्री. वा. पुं. वर्दे (व्हाइस चेअरमन), श्री. न. ग. पवार, श्री. श्री. गो. मराठे, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पद्मजी, श्री मा. वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. भा. म. गुप्ते' श्री. मो. रा. हमदरे.

★चालू खात्यांवर द. सा. द. शें. ½ टक्का व्याज दिलें जातें.
★सेव्हिंग्ज खात्यांत द. सा. द. शें. १॥ टक्का व्याज मिळतें.
★मुदती ठेवींची रक्कम तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत स्वीकारली जाते.
★सोलापूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची व्यवस्था केली आहे.

मुख्य कचेरी लक्ष्मी रोड, पुणें २ } सी. व्ही. जोग, मॅनेजर.

**पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह**

व्याख्यान ३ रें, ता. २८-१०-४७

## सहकारी चळवळीसंबंधीं कांहीं विचार

( श्री. य. द. खोले )

व्याख्यात्यांनीं प्रथमतः सहकारी चळवळीचे सुरवातीपासून आजपर्यंत निरनिराळया कालखंडांतून कसे पदार्पण होत गेलें हें खुलासेवार सांगून युद्धोत्तर पुनर्घटनेंत सहकारी चळवळीचें स्थान काय राहील याचें विवरण केलें.

ग्रामीण संस्था १९४२ पर्यंत फक्त कर्जाचाच व्यवहार अंगिकारीत होत्या. परंतु त्यानंतरच्या युद्धकालांत जी परिस्थिति निर्माण झाली तिला तोंड देण्यासाठी कर्जव्यवहाराव्यतिरिक्त इतर अनेकविध कामेंहि ग्रामीण सोसायट्यांनीं आपल्या कार्यक्षेत्रांत घेतलीं. परंतु बदलत्या परिस्थितीचे प्रवाहाबरोबर जसजशीं नियंत्रणें दूर होतील तसतशी सोसायट्यांनीं अंगिकृत केलेलीं इतर कामें कमी होऊन ग्रामीण सोसायट्यांना पुन्हा कर्जाचाच व्यवहार शिल्लक राहील व त्या दृष्टीनें ग्रामीण सोसायट्यांनीं खबरदारी घेऊन त्याप्रमाणें आपलें धोरण आखावयास पाहिजे असें सांगून व या कार्यासाठी ज्या दर्जाचे कार्यकर्ते व देखरेख पाहिजे ती मिळूं शकत नाहीं असें व्याख्यात्यांनीं प्रतिपादन केलें. प्रगति ही मुख्यत्वेंकरून चांगले कार्यकर्ते मिळण्यावर अवलंबून असून देखरेखी-मुळें सोसायट्यांना मार्गदर्शन होईल असें सांगितले. तसेंच, ग्रामीण सोसायट्या हा चळवळीचा गाभा असून त्यांचे व मध्यवर्ती जिल्हा बँकांचे संबंध जितके निकट असावयास पाहिजेत तितके ते असल्याचें दिसत नाहीं, असें ते म्हणाले.

सहकारी चळवळ ही जनतेची हल्ली जितकी सेवा करीत आहे ती फारच अल्प आहे असें म्हणावें लागते. सबब चळवळीनें आपला व्याप पुष्कळच वाढविला पाहिजे व हा व्याप वाढवितांना ज्यांची या चळवळीवर निष्ठा असेल व ज्यांना या चळवळीची तत्त्वें समजूं शकतील त्यांनाच या चळवळींत दाखल करून घेण्याची दक्षता घेतली पाहिजे. नाहींतर चळवळीचा शुद्ध पायाच ढासळून पडण्याची भीति उद्‌भवेल.

नागरी पतपेढ्यांबाबत विचार मांडतांना, नागरी पतपेढ्यांची आपल्या प्रांतात खूप वाढ झाली आहे असें सांगून नागरी सोसायट्यांचें भांडवल पुष्कळच वाढलें असून तें पडून राहिलं; हें भांडवल त्यांच्या सभासदांचे उद्योगधंद्याचे उपयोगासाठी व सभासदांना उद्योगधंद्यास प्रवृत्त व उत्तेजनासाठी गुंतविण्याचा प्रयत्न केल्यास पडून राहिलेलें भांडवल कारणीं लागेल.

ग्रामीण व नागरी पतपेढ्यांनीं आपल्या सभासदांबरोबर वेळोवेळीं विचारविनिमय करून व त्यांच्या अडिअडचणींचा विचार करून त्या दूर करण्याचा प्रयत्न करावा असें सांगून व्याख्यात्यांनीं आपलें भाषण संपविलें.

**एक दिवस आड बँका उघड्या रहाणार**—कराचीमधील बँकांनीं पाकिस्तान सरकारकडे एक पत्र पाठवून, बँका फक्त एक दिवस आड उघड्या ठेवण्यास परवानगी मागितली आहे. अनुभवी नोकरवर्गाच्या अडचणीमुळें असें करावें लागलें आहे. सध्या तेथील बँका दररोज, परंतु फक्त दोन तासच उघड्या असतात.

**निर्गतीसाठी स्वस्त फ्रँक**—फ्रेंच सरकारनें आपल्या चलनाची हुंडणावळ बदलली आहे, त्यामुळें फ्रेंच मालाच्या निर्गतीस प्रोत्साहन मिळून तो स्वस्त होईल आणि त्यामुळें ब्रिटिश मालास स्पर्धा निर्माण होईल अशी भीति ग्रेट ब्रिटनमध्यें व्यक्त केली जात आहे. नवा डॉलर-फ्रँक दर २१४·३९२ व पौंड-फ्रँक दर ८६४ असा आहे.


# NOTICE.

## The Bank of Maharashtra, Limited.

Notice is hereby given that the thirteenth Ordinary General Meeting of the Share-holders of the Bank of Maharashtra, Ltd., will be held at the Registered Office of the Bank, Kakakuva Mansion, Laxmi Road, Poona City, on Sunday, the 29th day of February, 1948, at 4 P. M. ( S. T. ) to transact the following business:-

( 1 ) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account and the Report of the Directors and of the Auditors for the year ended 31st December, 1947.

*( 2 ) To declare Dividend.

( 3 ) To elect four Directors in the places of the retiring Directors who are eligible for reelection.

( 4 ) To appoint Auditors and to fix their remuneration.

( 5 ) To Transact such other business as may be allowed by the Chairman.

Poona City,
25th January, 1948.

By order of the Board,
C. V. JOAG,
Manager.

*N. B.*—The Share Transfer Books of the Bank will be closed from the 23rd day of February, 1948 to the 5th day of March, 1948, both days inclusive.

* The Dividend, when declared, will be payable on and after *Saturday* the *27th day of Mar.* 1948 and the Dividend Warrants will be posted to the Registered Addresses of the share-holders. Change of Address if any, should immediately be communicated to the Bank.

नं. २० साबण बार सोप आणि वडी वापरा
माणिक सोप वर्क्स, कराड ( जि. सातारा )

कार्ड पाठवून व्ही. पी. नें मागवा
रक्तवर्धक खुराक
आंबावडी
फडके प्रॉडक्टस्
नागनाथ पार, पुणें.


## दि उगार शुगर वर्क्स लि., सांगली.

ता. ३० जून १९४७ अखेर संपणाऱ्या ८ व्या वर्षी कंपनीस निव्वळ नफा ४,२७,६०१ रु. इतका झाला आहे. यावर्षी साखरेची निर्मिती २९६८१ पोती झाली. साखरेसाठी २२२७१·६ टन ऊंस गाळला गेला. रिकव्हरीचें प्रमाण शेंकडा १३·४६ पडलें. चालू सालीं उंसाचें एकरेज गुदस्त सालापेक्षां ५० एकर इतकें अधिक असल्यानें व रिकव्हरीही चांगली पडल्यानें साखरेची निर्मिती चांगली झाली. रिकव्हरीचें प्रमाण सर्व हिंदुस्थानांतील साखर कारखान्यांमध्यें पहिल्या नंबरचें आहे, ही गोष्ट कंपनीला भूषणावह आहे. चालू सालीं हिंदुस्थान सरकारनें गेल्या सालापेक्षां सुमारें २५ टक्यांहून थोडा जास्त साखरेचा कंट्रोल दर वाढवून दर पोत्यास रु. ५८–५–६ केला आहे. सांगली दरबारनें आपल्या संस्थानास मिळणाऱ्या साखरेच्या कोटयाचा कंट्रोल दर, दर पोत्यास रु. ६१–१३–० इतका दिला आहे. उगार खुर्दला मिळण्यासारखी असलेली सर्व जमीन घेऊनही उसाचें क्षेत्र अपुरेंच होत असल्यानें रेल्वेच्या पलीकडे उगारचे हद्दींतील जमीनीस लागून असलेल्या ऐनापूर हद्दींतील जमिनी घेण्याचा प्रयत्न चालविला असून तेथील सुमारें ५०० एकर जमीन सध्यां खंडानें घेतली आहे. सन १९४७–४८ सालीं गाळण्यांत येणाऱ्या उंसाचें क्षेत्र ८०० एकर असून, सदर पिकाची परिस्थिति समाधानकारक आहे. १९४९ सालाकरतां उंसाचें पीक ९०० एकरावेक्षां थोडें जास्त होईल, अशी खटपट चालू आहे.

यंदा कंपनीस झालेल्या नफ्यांतून कॉंटिनजन्ट लायबिलीटी सर्व भागवून व ताळेबंदांतील कॅपिटल स्वरूपाच्या अंडररायटिंग कमिशन व ब्रोकरेज, डिफर्ड रेव्हिन्यू एक्सपेन्सेस सारख्या रकमा पूर्णपणें कमी करून व भरपूर रिझर्व्ह आणि डिप्रिसिएशन काढून साधारण शेअर्सचे भागीदारांना ३% डिव्हिडंड वाटलें आहे. कॉंटिंजंट लायबिलिटीचें राहिलेलें ४% स्पेशल डिव्हिडंड देणेंत आलें आहे. कंपनीनें रिझर्व्ह फंडांत ४३ हजार रुपये टाकले आहेत. सांगलींत रजिस्टर्ड ऑफिस व गोडाऊन बांधणेसाठी २५ हजारांची तरतूद नफ्यांतून केली आहे. महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटीस सांगलीच्या इंजिनिरिंग कॉलेजसाठी ३,००० रु. मंजूर केले आहेत आणि कै. डॉ. शिरगावकर ह्यांचे स्मारकासाठीं १० हजार रुपये काढून ठेवले आहेत. कॉन्टिन्जन्सी रिझर्व्ह फंडाकडे १,००,००० रु. वर्ग करण्यांत आले असून २७½ हजार रुपये शिलकी नफा पुढील सालचे ताळेबंदांत ओढला आहे. मेसर्स शिरगांवकर ब्रदर्सकडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे. सांगली स्टेटतर्फे सर मोरोपंत जोशी, प्रो. पी. एम्. लिमये व रावसाहेब एच. बी. कुलकर्णी हे डायरेक्टर बोर्डावर आहेत.

**ब्रिटिश निर्यात वाढविण्याचे प्रयत्न**—ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष मि. विलसन ह्यांनीं ब्रिटिश मालाची निर्यात वाढविण्यासंबंधीं नवीन बेत जाहीर केला आहे. विशेषतः कॅनडा, अमेरिका आणि अर्जेंटाइना ह्या देशांकडे निर्यात वाढविण्याचे प्रयत्न ब्रिटिश निर्यात व्यापाऱ्यांनीं करावे, असें सुचविण्यांत आलें आहे. १९४९ अखेर कापडाची निर्यात १ कोटी वारांवरून १० कोटी वारांपर्यंत जाईल असा त्यांचा अंदाज आहे.


# पेडणेकर आणि कंपनी लि.,



**शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.**

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८


### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


















हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.